**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक २ याची जबानी**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की : —

**माझे नाव : शैलजा दिलीप दाणी**
वय सुमारे : ५८ वर्षे, व्यवसाय : सेवानिवृत्त,
नेमणूक : फ्लॅट क्र.३, ओंकार अपार्टमेंट, कौठघाट रोड, भा.भा. नगर., जि.नाशिक.

**शपथेवर सरतपास सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्री.जी.ए. भोसले:**

१. एप्रिल २०१६ पासुन मी महाराष्ट्र कृषी उद्योग विभाग विकास महामंडळ मर्यादित, नाशिक येथे लेखा व प्रशासन अधिकारी या पदावर प्रभारी म्हणुन कार्यरत होते. सन २०१२ ते सन २०१६ या दरम्यान लेखा व प्रशासन अधिकारी म्हणुन श्री.एम.आर. तायडे, श्री. सुरवाडे व श्री. एस.के. जाधव हे काम पहात होते. लेखा व प्रशासन अधिकारी यांना विभागीय कार्यालयातून बनविलेल्या पावत्यांची तपासणी करणे, आलेल्या पैशांची धनाकर्ष तपासणे व कार्यालयामार्फत केले जाणारे पेमेंटवर सहया करणे इत्यादी कामे असतात. नाशिक विभागाअंतर्गत नाशिक व अहमदनगर या दोन जिल्हयांचा समावेश होतो. सदर जिल्हयांमध्ये खते, किटकनाशके, कृषी अभियांत्रीकी, नोगा व पशुखाद्य विभाग आहेत.

२. जरी नाशिक विभाग असला तरी अहमदनगर जिल्हयाअंतर्गत होणा—या विभागाचे व्यवहाराचे पैसे हे अहमदनगर जिल्हयातील आमच्या कार्यालयात येतात व तेथुन ते कार्यालयाचे एच.डी.एफ.सी. बॅकेच्या खात्यात जमा होत असतात. त्या जिल्हयात झालेल्या व्यवहाराची माहिती व पावत्या नाशिक विभागाला दिली जाते व त्यानुसार नाशिक विभागाच्या कार्यालयामध्ये संगणकावर तशी नोंद घेतली जाते.

३. जुलै २०१७ मध्ये आमच्या महामंडळाचे पुरवठादार मे.लक्ष्मी ड्रंकेन्स, सोलापुर यांनी पंपसंचाची रक्कम तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कर्जत यांच्याकडुन महामंडळाकडे रक्कम प्राप्त झालेली आहे व ती त्यांना

अदा करावी अशी विनंती केली. मी जेव्हा अहमदनगर जिल्हयाचे आमच्याकडे असलेल्या पावत्या व संगणकातील नोंदींची तपासणी केली असता तालुका कृषी अधिकारी यांच्याकडुन अशी कोणतीही रक्कम जमा झाल्याची नोंद मिळुन आली नाही. मे.लक्ष्मी ड्रंकेन्स यांनी सांगितलेल्या धनादेश क्रमांकाची आमच्या अभिलेखावर असणा—या पावत्यांमध्ये पाहणी केली असता तो धनादेश मे.उन्मेश फर्टीलायझर्स, चांदा यांच्या खात्यावर जमा झालेले असल्याचे माझे निदर्शनास आले व तसे मी त्यांना कळविले. मी सदर व्यवहाराबाबत अहमदनगर जिल्हयातील लिपीकांनी त्या नोंदीबाबत विचारणा केली असता त्यांनी सदरच्या व्यवहाराची नोंद अनावधानाने / नजरचुकीने झाली असल्याचे सांगितले. तसे त्यांनी लेखी निवेदनही दिलेले आहे. सदरचे लेखी निवेदन आरोपी रामदास कुलट यांनी व त्यावर राजेंद्र होले यांनी देखील सही केलेली आहे. आम्ही जेव्हा अभिलेखाची पाहणी केली तेव्हा आम्हाला आणखी चुकीचे व्यवहार झाले असल्याबाबत आढळुन आले. पहिल्या लेखी निवेदनानुसार आम्ही कुलट यांना ज्ञापन व त्याची प्रत कोल्हे यांना दिली होती. जेव्हा पुन्हा चुकीचे व्यवहार आढळले तेव्हा आम्ही त्याबाबत आमच्या मुख्य कार्यालयाला तोंडी कळविले होते.

४. महामंडळाचे मुख्य कार्यालयाने कळविलेल्या प्रकाराबाबतची सविस्तर चौकशी करणेकामी श्री.वासुदेव महाले यांच्या अंतर्गत सत्यशोधन समिती नेमली. श्री.महाले यांनी पंचायत समिती व तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालयीन अभिलेख तेथे जावुन पाहिले व आवश्यक दस्तांच्या छायांकित प्रती घेतल्या व त्याची पडताळणी नाशिक विभागातील असणा—या नोंदीसोबत घेतली. त्यानंतर महाले यांनी त्यांचा सत्यशोधन अहवाल बनविला व आमच्या मुख्य कार्यालयात सादर केला. महाले यांना त्यांच्या तपासणी दरम्यान तालुका कृषी अधिकारी व पंचायत समिती यांच्या नावाच्या रकमा या खाजगी खत वितरक, खाजगी शेतकरी व काही बचतगट यांच्या नावे बनल्याचे आढळले. त्यामुळे गैरव्यवहार झाला असे दिसुन आले. त्यानंतर मुख्य कार्यालयाच्या निर्देशनानुसार नाशिक विभागाच्या विभागीय

व्यवस्थापकांनी पोलीसात तक्रार दिली.

मध्यांतरामुळे पुढील सरतपास तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती,

( माया अ. देशमुख )
दि.०६/०६/२०२३ अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.८, अहमदनगर

अभियोग पक्षातर्फे दस्तऐवज दाखल करण्याचा अर्ज आल्याने आरोपीतर्फे त्यावर म्हणणे देवुन युक्तीवाद करण्यासाठी तोंडी मुदत मागितल्याने पुढील सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती,

( माया अ. देशमुख )
दि.०६/०६/२०२३ अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.८, अहमदनगर

**शपथेवर पुढील सरतपास सरकार पक्षातर्फे सरकारी विधिज्ञ श्रीमती.ए.व्ही.बाबर :**

५. आरोपींनी एकुण रक्कम ६६,०३,५९८/— रूपयांचा अपहार केलेला आहे. सदर अपहारामध्ये तयार केलेल्या पावत्यांपैकी काही पावत्यांवर आरोपी क्र.१ व ३ व काही पावत्यांवर आरोपी क्र.१ व २ यांच्या सहया आहेत. मी आरोपींना ओळखते. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहेत.

६. जेव्हा पैशांचा अपहार झाला त्यावेळी रामदास कुलट हे अहमदनगरचे लिपीक, राजेंद्र होले व महेश राजुरकर हे सहाय्यक व्यवस्थापक होते. त्यांचेकडे विक्री व वसुली तसेच कार्यालयीन पावत्या करणे ही कामे

होती. आम्ही केलेल्या तपासणी दरम्यान तालुका कृषी अधिकारी, कर्जत यांच्या नावे कृषी अभियांत्रिकीची पावती करणे आवश्यक असताना ती पावती मे.उन्मेश फर्टीलायझर्स, चांदा यांचे नावे खतविभागात दाखविलेली होती.

७. दि.०२/०९/२०१७ रोजी आम्हाला एक कबुलीनामा दिला होता. तो कबुलीनामा आरोपी रामदास कुलट यांनी दिलेला आहे. त्यावर रामदास कुलट, होले, मुसमाडे, भोले, पारधे व विभागीय व्यवस्थापक लांबे यांच्या सहया आहेत. सदर कबुलीनामा आमच्या कार्यालयात असू शकतो. मी कबुलीनाम्याची मुळप्रत दाखल करू शकते.

मध्यांतरामुळे पुढील सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती,

( माया अ. देशमुख )
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.८, अहमदनगर

**दि.०५/०७/२०२३**

**<u>शपथेवर पुढील सरतपास सरकार पक्षातर्फे सरकारी विधिज्ञ श्रीमती.ए.व्ही.बाबर</u> :**

८. मी सेवानिवृत्त असल्यामुळे कार्यालयीन अभिलेख माझे ताब्यात नव्हते म्हणुन मी मागील तारखेस साक्ष झाल्यानंतर संबंधित कार्यालयाला लेखी पत्र देवुन कबुलीनाम्याची मुळप्रत मागितली. मला कार्यालयातून मुळप्रत सापडत नाही असे प्रतिउत्तर मिळाल्याने मी ती मुळप्रत अभिलेखावर दाखल केलेली नाही. मी कार्यालयाला केलेले पत्र व त्यास मिळालेले उत्तर आजरोजी सोबत आणलेले आहेत व ते अभिलेखावर अर्जासह दाखल करत आहे. ते निशाणी ७९ च्या यादीसोबत दाखल केलेले आहेत. मी ते कबुलीनामा मिळाल्याबाबतची नोंद ज्या रजिस्टरला घेतलेली आहे ते रजिस्टर

आजरोजी सोबत आणलेले आहे. ते मुळ रजिस्टर कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक असल्याने मी ते अभिलेखावर दाखल करू शकत नाही. पण त्याची पडताळणी केलेली प्रत दाखल करेन. प्रस्तुत प्रकरणात झालेल्या अपहारामध्ये आरोपी क्र.१ ते ३ सामील होते.

९. आरोपी क्र.१ ते ३ यांची नियुक्ती आमच्या कार्यालयामार्फत झाली तेव्हा मुळ नियुक्ती पत्र आरोपी क्र.१ ते ३ यांना देण्यात आले. त्याची स्थळप्रत आमच्या कार्यालयात असू शकते. मी ते कार्यालयीन अभिलेख पाहून अभिलेखावर दाखल करू शकते.

१०. आमच्या कार्यालयाने फर्टीलायझर्स वितरकांसोबत मालाचा पुरवठा करण्यापुर्वी करार केले होते. त्याची मुळ प्रत मी आजरोजी सोबत आणलेली आहे. त्याची मी स्वत: प्रमाणित केलेली प्रत चौकशी दरम्यान तपासिक अधिका—यांना दिलेली होती. सदर करार हे संदिप कृषी सेवा केंद्र, बारागांव नांदूर, भंडारी कृषी सेवा केंद्र, कुकाणा, के.प्रकाश ॲन्ड कंपनी, उन्मेश फर्टीलायझर्स, चांदा, संदिप के.प्रकाश ॲन्ड कंपनी, अक्षय कृषी सेवा केंद्र, माउली कृषी सेवा केंद्र, शेवगांव, ए.बी. पंचारिया इत्यादी लोकांसोबत झाले होते. ते करार पाच वर्षांच्या कालावधीकरिता झाले असून त्यामध्ये नेमून दिलेल्या अटी व शर्ती नमूद आहेत. सर्व करारांवर संबंधित कालावधींमध्ये जे विभागीय व्यवस्थापक होते त्यांची सही आहे. मी सर्व विभागीय व्यवस्थापकांच्या सहया ओळखते. अभिलेखावर दाखल केलेल्या प्रमाणित प्रती या मुळ प्रतींवरून झेरॉक्स काढुन तुलना केलेले असल्याने ते मुळ प्रमाणे बरोबर आहेत. सदर कराराप्रमाणे वितरकांना मालाचे वितरण झाले होते. सदर करारनामे मी केलेले नाहीत. त्यामुळे त्याबाबत तसेच ते कसे बनले हे मी सांगू शकत नाही. कराराप्रमाणे वितरकांनी संपुर्ण रक्कम दिली किंवा नाही हे मला सांगता येणार नाही.

सरतपास पुर्ण.

## शपथेवर उलटतपास आरोपी क्र.१ तर्फे त्यांचे वकील :

११. मी लेखा व प्रशासन अधिकारी म्हणुन काम करते. आमच्या कार्यालयात येणा—या दस्तऐवजांप्रमाणे मी तपासणी करत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी वेळोवेळी नगर कार्यालयाला दस्तऐवज तपासणीकामी भेट दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, विभागीय कार्यालयाला दरमहा नगर शाखेतून लेखी खरेदी—विक्रीचे विवरणपत्र मिळत होते. हे म्हणणे खरे आहे की, आम्हाला नगर शाखेतून किती माल विक्री केला गेला व मालाचे किती पैसे मिळाले याचे विवरणपत्रही मिळत होते. आमच्या कार्यालयाचे नगर शाखेकरिता एच.डी.एफ.सी. बॅकेमध्ये खाते आहे. आमच्या कार्यालयामध्ये खरेदी—विक्रीचे व्यवहार रोखीने होत नव्हते. वितरकांकडुन येणारे सर्व डी.डी. हे आमचे कार्यालयाच्या नावाने येत होते व ते एच.डी.एफ.सी बॅकेमध्ये भरले जात होते. नगर शाखेकरिता आमचे केवळ एच.डी.एफ.सी. या एकाच बॅकेत खाते होते इतरत्र नाही. नगर शाखेमार्फत आमच्या कार्यालयाकडे केवळ बॅक खात्यावर पैसे भरले जात होते, ते काढले जात नव्हते. ते पैसे काढण्याचे अधिकार आमचे मुख्य कार्यालय, मुंबई यांचेकडे होते. नगर कार्यालयामध्ये कायमस्वरूपी चार व कंत्राटी तीन लोक कार्यरत होते. हे म्हणणे खरे आहे की, कुलट हे पुर्वी शिपाई म्हणुन आमच्या कार्यालयात कार्यरत होते. मला सांगता येणार नाही की, कामाकरिता लोक कमी होते म्हणुन कुलट यांना ते शिपाई असतानाही लिपीकाचे काम करावयास सांगितले जात होते. हे म्हणणे खरे आहे की, कुलट यांना दोन वरिष्ठ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, विभागीय कार्यालयाचा जो कोणताही पत्रव्यवहार नगर शाखेशी होत होता तो कुलट यांचे वरिष्ठांसोबत होत होता. हे म्हणणे खरे आहे की, कुलट यांना त्यांचे वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे काम करावे लागत होते. हे म्हणणे खरे आहे की, कुलट यांनी त्यांचा वरिष्ठांकडुन मिळालेल्या आदेशाप्रमाणे डी.डी.च्या नोंदीही केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ ने महामंडळाच्या खात्यातून एकही रूपया काढलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, महामंडळाने वितरकांना डी.डी.व्दारे पैसे भरण्याबाबत सुचना दिले होते. हे

म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे त्यांनी व्यवहार केले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ कडुन नजरचुकीने ज्या काही नोंदी झाल्या होत्या त्या आम्ही फेरपडताळणी करून नियमित केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, नियमितीनंतर ज्याचे नावे येणे बाकी आहे ते आमचे अभिलेखावर स्पष्ट दिसते. हे म्हणणे खरे आहे की, त्या नियमितीकरणामध्ये ज्याचे नावे पैसे जमा दाखवावयाचे होते तेही दाखविलेले आहेत.

१२. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या खातेउता—यानुसार आजरोजी उन्मेश फर्टीलायझर्सकडुन येणे बाकी दिसते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही उन्मेश फर्टीलायझर्सला व ज्यांचे चुकीच्या नोंदी झाल्या होत्या त्या सर्व वितरकांना पैसे भरण्याबाबत नोटीसा दिलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही कुलट यांना दिलेल्या नोटीसीस त्यांनी प्रतिउत्तर दिले होते. सत्यशोधक अहवाल बनविणारे वासुदेव महाले यांनी त्याचे अहवालाकरिता कोणकोणते दस्तऐवज पाहिले हे मला सांगता येणार नाही. त्यांनी आपला अहवाल आमच्या मुख्य कार्यालय, मुंबई येथे दिलेला आहे. त्या अहवालाचा व माझे कामाचा स्वरूपाचा एकमेकांशी संबंध येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जनरल व्हाउचरर्सचे नियमितीकरण झाल्याने नगर शाखेतील सर्व व्यवहार नियमित झालेले आहेत. मी सरतपासामध्ये सांगितलेली रक्कम ही नियमितीकरणानंतर वितरकांकडुन येणे बाकी दिसत आहे. ज्या कोणत्याही पावत्या मी सरतपासात सांगितलेल्या आहेत त्या पावत्यांवर आरोपी क्र.१ ते ३ यांनी माझेसमक्ष सहया केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, त्या सहया आरोपींच्या नाहीत.

१३. मला रेकॉर्ड बघितल्याखेरीज सांगता येणार नाही की, दि. ०२/०९/२०१७ रोजी आरोपी क्र.१ कुलट हे रजेवर होते किंवा कसे. मला आता निशाणी ८१/१ लगत दाखल रजेच्या अर्जाची छायांकित प्रत दाखविली. सदर अर्ज आरोपी कुलट यांनी नगर शाखेमध्ये दि. ०२/०९/२०१७ रोजीच्या रजेबाबत दिला असल्याचे दिसते. हे म्हणणे खरे

नाही की, दि.०२/०९/२०१७ रोजी आरोपी कुलट यांनी कबुलीयतनामा दिला असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, कबुलीयतनामा यावर कुलट यांची सही नाही.

१४. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी कुलट यांनी कधीही कोणताही कबुलीयतनामा सही करून विभागीय कार्यालयाकडे दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वितरकांसोबत पाच वर्षांकरिता करार केले असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, कोणत्याही वितरकाने पाच वर्षांचा करार आमच्या कार्यालयाच्या हक्कात करून दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वितरकांकडुन अनामत रक्कम घेतली जाते. हे म्हणणे खरे नाही की, वितरकांची अनामत रक्कम ही थकीत रकमेपोटी अॅडजस्ट केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत अपहाराची रक्कम ही आमच्या कार्यालयातून कोठेही गेलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कार्यालयाच्या कोणत्याही रकमेचा अपहार झालेला नाही.

१५. हे म्हणणे खरे आहे की, कराराच्या अटी या महामंडळातर्फे विभागीय व्यवस्थापक व वितरक यांच्यामध्ये ठरलेले असते. हे म्हणणे खरे आहे की, अजिंक्य कृषी सेवा केंद्र, खामगांव यांचेसोबत झालेल्या कराराची प्रत अभिलेखावर दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक आर्थीक वर्ष संपल्यानंतर ऑडीट केले जाते. हे म्हणणे खरे आहे की, जर का ऑडीट करताना अनियमितता दिसून आली तर त्याचा उल्लेख ऑडीट रिपोर्टमध्ये असतो. हे म्हणणे खरे आहे की, संबंधित वर्षाच्या ऑडीट रिपोर्टमध्ये तथाकथीत अपहाराबाबतचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, ऑडीट रिपोर्टमध्ये अनियमितता दिसून आल्याबाबतचा ऑडीटरचा कोणताही शेरा नाही.

१६. पोलीसांनी माझा जबाब घेतला होता. मी पोलीसांना जबाब घेतेवेळी आरोपी कुलट यांनी दि.०२/०९/२०१७ रोजी कबुलीयतनामा दिला

असे सांगितले होते. माझे पोलीसांसमोरील जबाबामध्ये केवळ कबुलीयतनामा दिला असे नमूद आहे. दि.०२/०९/२०१७ रोजी दिला ही तारीख नाही. माझे पोलीसांसमोरील जबाबामध्ये सदर तारीख का नमूद नाही याबाबत मला सांगता येणार नाही. आमच्या कार्यालयामार्फत विभागीय व्यवस्थापक यांनी वितरकांसोबत करार केले व त्या कराराची मुदत पाच वर्ष होती हे मी पोलीसांना जबाब घेतेवेळी सांगितले नव्हते. सदर बाब मी आजरोजी पहिल्यांदा न्यायालयात सांगत आहे. मी पोलीसांना जबाब देतेवेळेस कुलट व होले यांना ज्ञापन दिले असे सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, असे ज्ञापन कधीही देण्यात आले नव्हते म्हणुन मी त्याबाबत सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, नगर शाखेत तथाकथीत अपहार झाला असे मी खोटे सांगत आहे.

१७. माझे विरूध्द कार्यालयीन चौकशी झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी ग्रॅच्युईटीची रक्कम थांबविण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, कोणताही अपहार झालेला नसताना आमच्या मुख्य कार्यालयाने खोटी फिर्याद दाखल करण्याबाबत कळविले होते. हे म्हणणे खरे आहे की, मला दि.३१/०१/२०२३ रोजी सुग्रास ट्रेडर्स, नाशिक व स्थेनीयरा कॉपोरेशन, पुणे यांच्याकडुन येणे बाकी असणा—या रकमा वसुलीबाबत व प्रस्तुत अपहारासंदर्भातील चौकशीचे अधिकार अबाधित ठेवून सेवामुक्त केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझेविरूध्द कोणतीही चौकशी होवु नये म्हणुन मी आरोपींविरूध्द खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेली आरोपींविरूध्द तथाकथीत अपहारा संदर्भातील सर्व कथने खोटी व चुकीची आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी शपथेवर खोटी साक्ष देत आहे.

प्रकरण आरोपी क्र.२ व ३ तर्फे उलटतपास घेणेकामी पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती,

( माया अ. देशमुख )
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०८, अहमदनगर

**दि.११/०९/२०२३**

**शपथेवर उलटतपास आरोपी क्र.२ व ३ तर्फे त्यांचे वकील :**

१८. माझे सरतपासातील परिच्छेद क्र.२ मधील मजकुर 'जरी नाशिक विभाग असला तरी अहमदनगर जिल्हयाअंतर्गत होणा—या विभागाचे व्यवहाराचे पैसे हे अहमदनगर जिल्हयातील आमच्या कार्यालयात येतात व तेथुन ते कार्यालयाचे एच.डी.एफ.सी. बॅकेच्या खात्यात जमा होत असतात. त्या जिल्हयात झालेल्या व्यवहाराची माहिती व पावत्या नाशिक विभागाला दिली जाते व त्यानुसार नाशिक विभागाच्या कार्यालयामध्ये संगणकावर तशी नोंद घेतली जाते' हा मी पोलीसांना जबाब नोंदविताना सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, सदर मजकुर मी पहिल्यांदा सरतपासाचेवेळी वाढीव सांगितला. हे म्हणणे खरे नाही की, सदर मजकुर खोटा आहे. माझे सरतपासातील परिच्छेद क्र.३ मधील 'मी जेव्हा अहमदनगर जिल्हयाचे आमच्याकडे असलेल्या पावत्या व संगणकातील नोंदींची तपासणी केली असता तालुका कृषी अधिकारी यांच्याकडुन अशी कोणतीही रक्कम जमा झाल्याची नोंद मिळुन आली नाही' असा शब्दशः मजकुर माझे पोलीस जबाबात नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर सांगितलेला वाढीव मजकुर खोटा व चुकीचा आहे.

१९. तथाकथीत अपहार कालावधीत अहमदनगर विभागास लिपीक म्हणुन आरोपी क्र.१ काम पहात होते. मला कागदपत्र पाहिल्याखेरीज लक्ष्मी ड्रकेन्स यांचा पावती क्र.१४५६२ असा होता की नाही हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमचे संस्थेत रोखीने व्यवहार होत नव्हते व जे व्यवहार होत होते ते परिपत्रकानुसार डी.डी. स्वरूपात होत होते. मला सांगता येणार नाही की, लक्ष्मी ड्रकेन्सचा जो कोणताही धनादेश होता तो ॲक्सीस बॅकेचा होता किंवा कसे.

२०. मी पोलीसांना सत्यशोधक समिती नियुक्त झाली असे सांगितले नव्हते पण मी वासुदेव महाले यांची सत्यशोधक अधिकारी म्हणुन नेमणूक

झाली आहे असे सांगितले होते. मी सरतपासात वासुदेव महाले यांचे अंतर्गत समिती नेमली हे वाढीव सांगितलेले आहे. वासुदेव महाले सध्या हयात नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, केवळ साक्ष देता यावी म्हणुन महाले यांचे अंतर्गत समिती नेमली असे खोटे सांगत आहे. वासुदेव महाले यांनी तथाकथीत सत्यशोधन चौकशी दरम्यान माझा जाब—जबाब नोंदविला असे काही घडले नाही.

२१. अहमदनगर विभागात हजेरीपट ठेवलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या हजेरी पटामध्ये हजर असल्यास 'पी', गैरहजर असल्यास 'ए', फिरतीवर असल्यास 'टी' आणि हक्काची रजा असल्यास 'पी. एल.' असे लिहीले जाते. मला आता निशाणी ८३ सोबत दाखल हजेरीपट ची प्रत दाखवली. त्यानुसार दिनांक २५ ते २७ एप्रिल २०१७ पर्यंत आरोपी क्र.२ हे व आरोपी क्र.३ हे हक्काची रजा व फिरतीवर असल्याचे दिसते. मला आता निशाणी ५९ लगत दाखल पावती दाखवली. ती पावती दिनांक २५/०४/२०१७ रोजीची आहे. त्या पावतीमध्ये नमुद नंबर हा धनादेश आहे की डी. डी. आहे स्पष्ट होत नाही. मला आठवत नाही की, नमुद नंबर हा ॲक्सिस बॅंकेचा धनादेश असल्याचे पडताळणी दरम्यान निदर्शनास आले होते किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, पावत्यांची संगणकीय नोंद ही नाशिक कार्यालयात केली जात होती. सदर नोंद डाटा ऑपरेटर घेत होता. त्या डाटा ऑपरेटरने केलेले कामाची तपासणी करण्याचे काम माझे होते. हे म्हणणे खरे आहे की, डाटा ऑपरेटरने घेतलेल्या नोंदी संगणकात तसेच प्रिंटद्वारे सांभाळल्या जात होत्या. हे म्हणणे खरे नाही, कृषी अधिकारी, कर्जत यांनी चार लाख चाळीस हजार रूपयांचा धनादेश अगर डी.डी. दिला नाही. कृषी अधिकारी, कर्जत यांचे नावे चार लाख चाळीस हजार रूपयांची पावती बनविल्याचा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, अशी पावती बनलेलीच नाही त्यामुळे दाखल करण्याचा प्रश्नच नाही. हे म्हणणे खरे आहे की, जे.व्ही. नोंदनुसार कृषी अधिकारी, कर्जत यांचे नावे चार लाख चाळीस हजार रूपये हे वर्ग करण्यात आलेले

आहेत. सदरची नोंद ही नाशिक विभागात झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरची जे. व्ही. ची खोटी नोंद करण्यात आली. सदरची नोंद ही लेखा प्रशासन म्हणुन मी केलेली आहे. सदरची नोंद कोणत्या तारखेला घेतली ते मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, जे.व्ही.ची खोटी नोंद करण्यात आली आहे. मला सांगता येणार नाही की, जे.व्ही.ची सर्व्हे क्र.४२ ची नोंद ही दि.२४/०८/२०१७ रोजी घेतली किंवा कसे. ही नोंद घेताना कोणताही सत्यशोधक अहवाल प्राप्त झाला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, सदर नोंद घेण्याबाबत मला कोणताही लेखी आदेश वरिष्ठांनी दिला नव्हता. तसा लेखी आदेश अभिलेखावर दाखल आहे.

२२. वासुदेव महाले हे पुर्वीपासुन दरवर्षी फिर्यादी संस्थेचे ऑडीट करतात. त्यांचे कोणत्याही ऑडीट रिपोर्टमध्ये अफरातफर झाली असे नमूद नाही. मी पडताळणी करताना जर का शेरा देण्यासारखी बाब असेल तर शेरा देते. मला नि.क्र.५९ लगत दाखल पावती दाखविली. त्यावर मी पडताळणी केली असा शेरा मारलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अहमदनगर विभागाची पाहणी केली व त्यात लक्ष्मी ड्रकेन्स करिता तालुका कृषी अधिकारी कर्जत बाबतचा गैरव्यवहार आढळला असे मी खोटे सांगत आहे.

२३. तालुका कृषी अधिकारी, कर्जत यांनी आम्हाला डी.डी. दिला होता. त्या डी.डी.ची प्रत आमच्याजवळ नसल्याने प्रस्तुत प्रकरणात आमचेजवळ नसल्याने पुराव्याकामी दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, असा कोणताही डी.डी. आम्हाला मिळाला नव्हता. दि.२१/०४/२०१७ रोजी ५७९७६७ हा सेंन्ट्रल बॅक ऑफ इंडियाचा धनादेश अगर डी.डी. आम्हाला प्राप्त झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, जो कोणताही धनादेश अगर डी.डी. प्राप्त होतो त्याची पावती दिली जाते. जर एखादी पावती चुकीची बनविली गेलेली आहे असे निदर्शनास आले तर ती पावती रद्द केली जात नाही. हे म्हणणे खरे आहे की, जर का एखादी पावती चुकीची बनल्याचे निदर्शनास आले तर त्याची लेखी सुचना / अहवाल वरिष्ठांना

दिली जाते. मी प्रस्तुत प्रकरणात अशी कोणतीही चुकीच्या पावत्या बनल्याचे निदर्शनास आल्याची लेखी सुचना / अहवाल माझे वरिष्ठांना दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, चुकीच्या पावत्या बनल्याचे निदर्शनास आले असा लेखी अहवाल वरिष्ठांना दिलेला नाही.

२४. मी स्वत: सत्यशोधन अधिकारी यांना प्रस्तुत प्रकरणासंदर्भात कोणतेही कागदपत्र दिले नव्हते. सत्यशोधक अधिका—यांनी केलेल्या तथाकथीत चौकशीत मी हजर नव्हते. कोणत्याही कर्मचा—यास त्याची कार्यपध्दतीकरिता लेखी कार्यालयीन आदेश नेमणुकीच्या वेळेस महामंडळ देते.

पुढील उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती,

( माया अ. देशमुख )
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०८, अहमदनगर

**दि.१९/१०/२०२३**

**शपथेवर पुढील उलटतपास आरोपी क्र.२ व ३ तर्फे त्यांचे वकील :**

२५. मला सांगता येणार नाही की, तालुका कृषी अधिकारी, कर्जत यांनी कोणतीही रक्कम आमचे कार्यालयाला जमा केली हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेला आहे किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, असा कोणताही पुरावा आमचेकडे नसल्याने आम्ही तो अभिलेखावर दाखल केलेला नाही. मी असा पुरावा तपासात पोलीसांना दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, असा कोणताही पुरावा आमचेकडे नसल्याने तो पोलीसांना दिला नव्हता.

२६. पंचायत समितीने अथवा कोणत्याही वितरकाने अहमदनगर विभागाबाबत कोणत्याही कर्मचारी, अधिकारीबाबत कोणतीही लेखी तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, कर्मचा—यांची आमच्या कार्यालयात नेमणूक झाल्यानंतर त्यांना त्यांचे कर्तव्य व जबाबदारीची यादी दिली जाते. मला आता निशाणी ७०/२ सोबत दाखल कर्तव्य व जबाबदारीची यादी दाखविली. ही आरोपी क्र.२ व ३ यांना दिलेली दिसते. सदर यादीमध्ये आरोपी क्र.२ व ३ यांनी कार्यालयीन पावतीवर सहया करण्याचे कर्तव्य व जबाबदारी नाही. हे म्हणणे खरे आहे की, डी.एम. जाधव हे अहमदनगर विभाग प्रमुख होते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कार्यालयात सर्व कर्मचारी व अधिकारी यांचे स्पेसिमन सिगनेचर हे घेतले जातात. प्रस्तुत प्रकरणात आरोपीचे स्पेसिमन सिगनेचर तपासिक अधिका—यांना आम्ही दिले नाहीत.

२७. पोलीसांनी मला चौकशीकामी हजर राहावे असे पत्र दिले नव्हते. मी पोलीस स्टेशनला स्वत: जावुन जबाब दिलेला आहे. जबाब देताना फिर्यादी माझेसोबत होते. माझी व फिर्यादीची चर्चा झाली व त्यानंतर पोलीसांनी माझा जबाब नोंदविला असे काही घडले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.३ ची नेमणुक पशु विभागाकरिता करण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.३ ची नेमणुक ही सहायक व्यवस्थापक, पशु खाते अशी होती. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत अपहार अभियांत्रिकी विभागा संदर्भातील आहे. पशु विभाग व अभियांत्रिकी विभाग वेगवेगळे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, अभिलेखावर दाखल ब—याच पावत्यांवर केवळ क्लार्कच्या सहया आहेत.

२८. हे म्हणणे खरे नाही की, सत्यशोधन अहवाल महाले यांनी दिला असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सेवानिवृत्त झाल्याने तथाकथित अपहारातील वितरकांकडे कोणतीही रक्कम येणे बाकी नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ व ३ यांना पावत्या बनविण्याचे काम

होते हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ व ३ यांचे पावत्या बनविण्याचे काम होते हे मी जाणीवपुर्वक खोटे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, कोणत्याही पावतीवर आरोपी क्र.२ व ३ यांची सही नाही. हे म्हणणे खरे आहे की, कबुलीयतनाम्यामध्ये आरोपी क्र.२ व ३ यांनी अपहार केला असे नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, अभियांत्रिकी विभाग, अहमदनगरचे प्रमुख फिर्यादी होते. हे म्हणणे खरे नाही की, अभियांत्रिकी विभागातील चुका दुस—या विभागांवर टाकण्याकरिता सदरची खोटी फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व माझी विभागीय चौकशी झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ व ३ यांचा प्रस्तुत प्रकरणाशी कोणताही संबंध नसताना त्यांचेवर खोटे आरोप करून खोटया खटल्यात गोवले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

( माया अ. देशमुख )
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०८, अहमदनगर

**दि.०६/११/२०२३**

**निशाणी ९४ वरील आदेशान्वये जादा सरतपासणीची परवानगी दिली.**

**<u>शपथेवर सरतपास सरकार पक्षातर्फे सरकारी वकील</u> :**

२९. मी माझा पुरावा झाल्यानंतर तालुका कृषी अधिकारी, कर्जत यांनी ४,४०,००० रूपये महामंडळाला अदा केल्याचे पत्र, संदिप कृषी सेवा केंद्र, बारागांव नांदुर यांनी त्यांना माल दिला नसतानाही बिले त्यांचे नावे पडले असल्याचे स्टॅम्प पेपरवर लिहून कळविले होते तो स्टॅम्प पेपर, आरोपींच्या महामंडळातर्फे नियुक्ती करताना दिलेल्या आदेशाची प्रत, उन्मेश फर्टीलायझर्स

यांचे आमच्याकडील खातेउतारा, आमचा अहमदनगर विभागाकरिताचा एच. डी.एफ.सी. बॅंकेचा खातेउतारा इत्यादी दाखल केले होते.

३०. लक्ष्मी ड्रंकेन्स यांनी आमचेकडे पुरवठा केलेल्या पंम्पसेटस्‌चे ४,४०,००० रूपये तालुका कृषी कर्जत यांचेकडुन महामंडळाला अदा झालेले असल्याने ते त्यांना द्यावेत असे कळविले होते. सदर बाब कळविताना त्यांनी तालुका कृषी अधिकारी कर्जत यांनी पैसे महामंडळाकडे जमा केले असल्याचे पत्र सादर केले होते. मला आता निशाणी ९७/६ लगत दाखल पत्र दाखविले. या पत्रानुसार आम्हाला समजले की, तालुका कृषी अधिकारी कर्जत यांनी महामंडळाच्या नावे ४,४०,००० रूपये अदा केलेले आहेत. सदर मिळालेल्या माहितीनुसार मी स्क्रुटीनी केली होती. स्क्रुटीनीमध्ये सदर ४,४०,००० ची पावती तालुका कृषी अधिकारी कर्जत यांचे नावे तयार न होता ती उन्मेश फर्टीलायझर्स यांचे नावे तयार झाले असल्याचे आढळले. ती पावती आमच्या नगर विभागातील कार्यालयात असणा—या कुलट व होले यांचे सहिची दिसते. स्क्रुटीनीमध्ये तयार केलेल्या पावतीनुसार पैसे हे उन्मेश फर्टीलायझर्स यांचे खात्यात जमा झाले असल्याचे दिसते. अशा पध्दतीने ब—याच व्यवहारांमध्ये एकाच्या नावाचे पैसे दुस—याचे नावाने अदा केले गेले असल्याचे स्क्रुटीनीमध्ये आढळल्याने आरोपींनी महामंडळाची फसवणुक केली असल्याचे आढळुन आले.

३१. पोलीसांनी माझेसमक्ष आमच्या कार्यालयात पंचनामा केला होता. पोलीसांनी साद पंचनाम्याअंतर्गत आमच्याकार्यालयातील लेजरबुक, पावत्या, इनव्हॉईसच्या कॉपीज इत्यादी घेतल्या होत्या. सदर दस्तऐवज प्रस्तुत प्रकरणाशी संबंधित होत्या. त्या पोलीसांनी माझेसमक्ष जप्त केल्या होत्या. सदर पंचनाम्याची एक प्रत आम्हालाही दिली होती. पंचनामा माझेसमक्ष केला म्हणुन पोलीसांनी त्यावर माझी सही घेतली होती.

सरतपास पुर्ण.

न्यायालयीन कामकाजाची वेळ संपल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती,

( माया अ. देशमुख )
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०८, अहमदनगर

**दि.१८/०३/२०२४**

**शपथेवर उलटतपास आरोपी क्र.१ तर्फे त्यांचे वकील :**

३२. वादातील ४,४०,०००/— रूपये तालुका कृषी अधिकारी कर्जत यांचेकडुन महामंडळाच्या खात्यात जमा झालेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, महामंडळामध्ये कोणताही व्यवहार रोखीचा होत नाही. अहमदनगर येथे महामंडळाचे एकच खाते असुन ते एच.डी.एफ.सी. बकेमध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या कोणत्याही व्यक्तीचे चेक अगर डी.डी. येतात ते सर्व एच.डी.एफ.सी. बॅकेच्या महामंडळाच्या खात्यात भरले जातात.

३३. मी महामंडाळाची लेखा व प्रशासन अधिकारी होते. महामंडळाकडे तपासणी अधिकारी देखील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, तपासणी अधिकारी महामंडळाच्या शाखांना वेळावेळी भेट देत असतात. तपासणी अधिकारी शाखांना भेट दिल्यानंतर तेथील अभिलेख व रजिस्टर इत्यादी तपासतात. तपासणी अधिकारी केलेल्या तपासाचे अहवाल आमच्या रिजनल ऑफिसला दाखल करतात. हे म्हणणे खरे आहे की, तपासणी अधिका—याने फिर्यादीत नमूद केलेल्या व्यवहाराबाबत अगर गैरव्यवहाराबाबत कोणताही उल्लेख त्यांचे अहवालात केलेला नाही. कोणत्याही पावतीवरील सही माझेसमक्ष झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटया पावत्या तयार करून बोगस सहया करून अभिलेखावर दाखल केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, महामंडळाच्या अभिलेखावर उन्मेश फर्टीलायझर्स कडुन

रक्कम येणे बाकी दिसत आहे. ती रक्कम भरण्याबाबत उन्मेश फर्टीलायझर्सना नोटीस दिलेली आहे. कराराच्यावेळी स्टॅम्प हा लिहुन देणारच आणतो असे होत नाही. मी पोलीसांना जबाब देतेवेळी संदीप कृषी सेवा केंद्राबाबतचा स्टॅम्प त्यांचे ताब्यात दिला नव्हता. माझे पोलीसांसमोरील जबाबामध्ये सदर स्टॅम्प बाबत उल्लेख नाही. मी प्रस्तुतचा स्टॅम्प व प्रस्तुतच्या स्टॅम्पबाबतचे कथन हे न्यायालयामध्ये फेरपातसणीच्या दरम्यान दाखल केलेले आहे व सांगितलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, पुरावा तयार करण्याचे दृष्टीने खोटा स्टॅम्प तयार करून अभिलेखावर दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, महामंडळाच्या कामाकरिता स्टॅम्प हे नेहमीच खरेदी करून कार्यालयात ठेवलेले असतात. हे म्हणणे खरे नाही की, वादातील स्टॅम्प ज्या तारखेला खरेदी केला त्याच तारखेला करार तयार करण्यात आला होता.

३४. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक तालुक्याचे कृषी अधिकारी वेगवेगळे पत्र महामंडळाच्या नावे देतात. हे म्हणणे खरे आहे की, कर्जत व जामखेड हे दोन तालुके वेगवेगळे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, जर का कर्जत तालुक्याने पत्र दिले असेल तर त्यामधील जामखेड तालुक्यातला व्यवहाराचा उल्लेख करण्याची कोणतीही आवश्यकता नसते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे पत्र तयार करून अभिलेखावर दाखल केलेले आहे.

३५. मी स्वत: नगर जिल्हयाला तपासणी कामी भेटी दिलेल्या आहेत. मी जेव्हा नगर जिल्हयाला तपासणी कामी भेटी दिल्या होत्या तेव्हा मला कोणताही गैरव्यवहार आढळला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी अधिकचे सरतपासात सांगितलेला सर्व मजकुर खोटा व चुकीचा आहे.

**शपथेवर उलटतपास आरोपी क्र.२ व ३ तर्फे वकील श्री. गुंदेचा :**

३६. मी सरतपासात नमूद केलेले तालुका कृषी अधिकारी कर्जत यांच्या पत्रात ज्या डी.डी. चा उल्लेख केलेला आहे तो कोणत्या बॅंकेचा आहे याचा उल्लेख नाही. साक्षीदार पुन्हा सांगते की, त्या पत्रात डी.डी.

नसुन धनादेश होता. हे म्हणणे खरे नाही की, जर का पत्रात बॅकेचा उल्लेख नसेल तर आमच्या अभिलेखावर नोंद घेतल्यानंतर कोणता धनादेश अगर डी. डी. कोणी दिला याचा ताळमेळ लागत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पावत्यांवरच्या सहया या आरोपींच्याच आहेत हे दाखविण्याकरिता आरोपींचे स्पेसिमन सिगनेचर मी दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, पावत्यांवर आरोपींच्या सहया आहेत असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, जर का महामंडळाचे कोणतेही मुळ दस्तऐवज त्रयस्थ व्यक्तीला किंवा पोलीसांना द्यायचे असतील तर दस्त दिल्याची व मिळाल्याची पोहोच आमच्या अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. हे म्हणणे खरे आहे की, दस्त ताब्यात असणा—या व्यक्तीची किंवा वरिष्ठांची लेखी परवानगी घेतल्याशिवाय महामंडळाचे दस्त त्रयस्थ व्यक्तीला देता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, महामंडळामध्ये हालचाल रजिस्टर (मुव्हमेंट रजिस्टर) ठेवले जाते. हे म्हणणे खरे आहे की, कोणतेही दस्तऐवज महामंडळाकडे आले किंवा गेले याची नोंद आवक—जावक रजिस्टरला घेतली जाते. हे म्हणणे खरे नाही की, जर का महामंडळाचे कागदपत्र हाताळणे कामी त्रयस्थ व्यक्तीस किंवा पोलीसांना चौकशी कामी दिले तर त्याची नोंद हालचाल रजिस्टरला घेतली जाते. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणात मी पुराव्यादरम्यान आवक—जावक रजिस्टर अगर हालचाल रजिस्टर दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेले कोणतेही दस्तऐवज हे महामंडळाचे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना शिक्षा व्हावी या उद्‌देशाने बनावट कागदपत्र तयार करून आम्ही पोलीसांना दिले अगर चौकशीकामी अभिलेखावर दाखल केलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, अभिलेखावर दाखल केलेला तथाकथीत संदीप कृषी सेवा केंद्राचे प्रतिज्ञापत्र त्याचे सत्यतेच्या शाबीतीकरिता नोंदविलेले नाही. मला सांगता येणार नाही की, संदीप कृषी सेवा केंद्राचे तथाकथीत प्रतिज्ञापत्र हे महामंडळाचे कंत्राटी कर्मचारी पारधे यांचे हस्ताक्षरात आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिज्ञापत्रात काय मजकुर लिहावयाचा आहे तो मी सांगितला होता. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१३ साली आरोपी क्र.३ यांची नेमणुक अहमदनगर कार्यालयात नव्हती व

ती कोल्हापुर येथे होती. मी सरतपासात संदीप कृषी सेवा केंद्रातर्फे दाखल झालेल्या ज्या प्रतिज्ञापत्राचा उल्लेख केलेला आहे त्या प्रतिज्ञापत्रात राजुरकर यांचे विरूध्द कोणतेही आरोप नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपींचे नियुक्तीचे दस्तऐवज दाखल केलेले आहेत पण त्यानंतर जशा जशा नेमणुका झाल्या त्याबाबतचे दस्तऐवज दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कोणताही गुन्हा केलेला नसताना त्यांचेवर खोटा गैरव्यवहाराचा आरोप केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींविरूध्द खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

MAYA ABHIJEET DESHMUKH Digitally signed by MAYA ABHIJEET DESHMUKH

( माया अ. देशमुख )

दि.०६/०४/२०२४

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०७, अहमदनगर